महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमआयएस-०१२०/सीआर १०/२०२३/मा.तं. दिनांक:-२४ एप्रिल, २०२३

# -:प्रसिध्दीपत्रक:-

विषय:- महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३-परीक्षेच्या आयोजनासंदर्भात
संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०१/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी नियोजित विषयांकित परीक्षेच्या आयोजनाच्या वेळी आयोगाकडून सर्व ३७ जिल्हाकेंद्रांवरील सर्व परीक्षा उपकेंद्रांवर सीसीटीव्ही चित्रीकरण करण्यासह सर्व उमेदवारांची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविण्यात येणार आहे.

२. उमेदवारांनी परीक्षेचा प्रत्यक्ष कालावधी सुरु झाल्यानंतर ते संपेपर्यंत आपापसात कोणत्याही कारणास्तव बोलणे, कोणत्याही वस्तूंची देवाणघेवाण करणे, पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालणे, परवानगी नसलेली कोणतीही वस्तू/साहित्य जवळ बाळगणे, परीक्षेच्या आयोजनात अडथळा आणणे, इत्यादी कृत्य गैरप्रकाराचा प्रयत्न समजण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणी आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील सूचना क्रमांक ९.२ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

३. प्रस्तुत परीक्षेनंतर सर्व उपकेंद्रावरील सीसीटीव्ही चित्रिकरणाची तपासणी करण्यात येईल. सदर तपासणीमध्ये कोणताही उमेदवार आक्षेपार्ह वर्तन करत असल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवारांवर परीक्षेतील गैरप्रकाराचा प्रयत्न समजून कारवाई करण्यात येईल.

ठिकाण:-नवी मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग